# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मुख्य सचिव यांनी घेतला महा मेट्रो रेल प्रकल्पाचा आढावा




नागपूर : महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक (भाप्रसे) यांनी आज मेट्रो भवनला भेट देत महा मेट्रो द्वारे कार्यरत नागपूर, पुणे, ठाणे मेट्रो रेल प्रकल्पाचा आढावा घेतला. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी महा मेट्रोच्या वतीने त्यांना मेट्रोच्या संपूर्ण कार्याची आणि प्रगतीची माहिती प्रदान केली.

श्रीमती सौनिक यांनी मेट्रोभवन येथील एक्सपरियन्स सेंटर, सिटी सेंटर मॉडेल, ऑपरेशनल कंट्रोल सेंटर (ओसीसी) देखील दाखवण्यात आले. मेट्रो ट्रेनचे कामकाज आणि ऑपरेशनल कंट्रोल सेंटरच्या इतर बाबीबाबत देखील त्यांना माहिती प्रदान करण्यात आली. मेट्रो ऑपरेशन्सच्या डॉट नेट, 6-डी बीम मॉडेल, गेल्या काही वर्षांमध्ये साध्य केलेली प्रगती, अंमलबजावणी दरम्यानची आव्हाने इत्यादींचे सादरीकरण करण्यात आले.

आढावा बैठकीदरम्यान श्रीमती सौनिक महा मेट्रोशी संबंधित मंत्रालय स्तरावरील प्रलंबित समस्या जाणून घेतल्या व त्वरिने मार्गी लावण्याची ग्वाही दिली. यासोबतच फर्स्ट अँड लास्ट माईल कनेटिव्हिटी अंतर्गत नागपूर महानगरपालिका सोबत योग्यरित्या नियोजन करून मल्टीमॉडेल इंटिग्रेशन करण्याच्या सूचना दिल्या जेणेकरून नागरिकांना सहज रित्या परिवहनाचे साधन उपलब्ध होऊ शकेल व नागरिक स्वतःचे वाहना ऐवजी सार्वजनिक परिवहनाचे साधन जास्तीत जास्ती वापरतील सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून पैसे वाचविण्यास मदत व सोबतच या निमित्ताने पर्यावरण राखण्यास देखील मदत होईल. तसेच मुख्य सचिव यांनी मेट्रो स्टेशन येथे उपलब्ध व्यवसायिक जागेवर स्थानिक कला तसेच खाद्य पदार्थ यांना कश्या प्रकारे पुढे आणता येईल व प्रेरित करता येईल या करता उपाय योजना कराव्या असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

नागपूर शहरामध्ये नागपूर मेट्रोच्या रूपात अतिशय चांगली वाहतूक प्रणाली तयार करण्यात आली आहे, आंतरराष्ट्रीय दर्ज्याची पायाभूत सुविधा आज नागपूर, पुणे शहरामध्ये उपलब्ध आहे हे अभिमानाची बाब आहे. मेट्रोचे तिकीट दर सर्व सामान्य व्यक्तींना परवडणारे आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी नागपूरमहानगरपालिका आयुक्त श्री. अभिजित चौधरी, नासुप्र सभापती श्री. संजय मीणा, महा मेट्रो संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री अनिल कोकाटे, संचालक (वित्त) श्री. हरेंद्र पांडे, संचालक (प्रकल्प) श्री. राजीव त्यागी उपस्थित होते.